Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। मंगळवार, दि. २३ जून २०२६ । वर्ष १ ।अंक ७६ ।पाने २। Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

शिरपूरमध्ये दारूबंदी विभागाची धडक कारवाई

(पान २ वर)



स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीत महायुतीची एकहाती सत्ता • भाजप ११, शिंदे सेना ३, राष्ट्रवादी २ जागांवर विजयी

# महायुतीचा विजय: विधान परिषदेत 16 जागांवर भगवा झेंडा!

## महाविकास आघाडीचा पूर्ण सफाया; नाशिकमध्ये भाजप बंडखोर गोकुळ गिते यांचा विजय, शिंदे गटाला धक्का

जन सम्राट टाईम्स

**मुंबई : महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या निवडणुकीत महायुतीने अभूतपूर्व यश मिळवत १७ पैकी तब्बल १६ जागांवर विजय संपादन केला आहे. या निकालामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महायुतीची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून महाविकास आघाडीला मात्र एकही जागा जिंकता आली नाही.**

मात्र नाशिकमधील निकालाने महायुतीतील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले असून, भाजप बंडखोर उमेदवाराने शिंदे गटाच्या अधिकृत उमेदवाराचा पराभव करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे.महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत आणि जिल्हा परिषदांमधील संख्याबळ लक्षात घेता महायुतीचे वर्चस्व आधीपासूनच निश्चित मानले जात होते. त्यानुसार भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनी जवळपास सर्वच मतदारसंघांमध्ये विजयाची पताका फडकावली. मात्र नाशिकमध्ये चित्र वेगळे पाहायला मिळाले. भाजपचे बंडखोर उमेदवार गोकुळ गिते यांनी शिवसेना शिंदे गटाचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांचा पराभव केला. गिते यांना ३५७ मते मिळाली, तर दराडे यांना केवळ २४८ मतांवर समाधान मानावे लागले. या निकालानंतर भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही सदस्यांनी बंडखोर उमेदवाराला पाठिंबा दिल्याचा आरोप शिंदे गटाकडून करण्यात आला आहे. केंद्रीय गृहमंत्री Amit Shah यांनी नुकतेच कोल्हापूर दौऱ्यात उपमुख्यमंत्री Eknath Shinde यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले होते. त्यानंतर अवघ्या काही दिवसांत नाशिकमध्ये शिंदे गटाच्या उमेदवाराचा झालेला पराभव महायुतीतील अंतर्गत नाराजीचे संकेत मानले जात आहेत. दरम्यान, अमरावती मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार हर्षजीत देशमुख यांना एकही मत मिळाले नाही. प्रचारादरम्यान ते रुग्णालयात दाखल झाल्याने पक्षातीलच काही सदस्यांनी त्यांच्याविरोधात मतदान केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. नागपूरमध्येही काँग्रेसची मते फुटल्याचे बोलले जात आहे. सातारा-सांगली मतदारसंघात भाजपचे धैर्यशील कदम विजयी झाल्याने भाजपने सुटकेचा निश्वास सोडला. जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीवेळी निर्माण झालेल्या वादाचे पडसाद या निवडणुकीत उमटतील, अशी शक्यता वर्तवली जात होती.



### विधान परिषदेत महायुती अधिक मजबूत

या निवडणुकीनंतर विधान परिषदेतील महायुतीचे संख्याबळ आणखी वाढले आहे. भाजप ३५ सदस्यांसह सर्वात मोठा पक्ष ठरला असून शिंदे गटाचे ११ आणि अजित पवार गटाचे १० सदस्य आहेत. त्यामुळे विधान परिषदेत महायुतीचे वर्चस्व अधिक भक्कम झाले आहे. महाविकास आघाडीला एकही जागा मिळाली नसल्याने विरोधकांसाठी हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. तर दुसरीकडे नाशिकमधील निकालामुळे महायुतीतील अंतर्गत राजकारण आणि समन्वयाचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निकाल राज्याच्या राजकारणासाठी महत्त्वाचा मानला जात आहे.

### पक्षनिहाय निकाल

| पक्ष | विजयी | जागा |
| --- | --- | --- |
| भाजप | विजयी | ११ |
| शिवसेना | विजयी | ३ |
| राष्ट्रवादी | विजयी | २ |
| अपक्ष | विजयी | १ |
| महाविकास आघाडी | | ० |

### नंदकुमार महाजन 582 मतांनी विजयी

जिल्ह्यामध्ये महायुतीचे उमेदवार नंदकुमार महाजन यांना विधान परिषदेच्या निवडणुकीमध्ये सर्वाधिक 582 मते मिळाली. त्यांनी महाविकास आघाडीची मते आपल्या पारड्यात पाडून विजय नोंदविला. मात्र पाचोऱ्याचे किशोर आप्पा पाटील यांनी नाशिकच्या विजयावर मात्र आपला आक्षेप नोंदविला. आमच्या नेत्यांनी दिलेला शब्द जळगावमध्ये पाळला, मात्र नाशिकमध्ये त्यांनी शब्द पाळलेला नाही; अशी प्रतिक्रिया प्रतिनिधीशी बोलताना पाचोऱ्याचे आमदार किशोर आप्पा पाटील यांनी दिली. विधान परिषदेच्या निवडणुकीमध्ये नामनिर्देशन अर्ज भरण्यापासून माघारीनंतरही अनेक घडामोडी झाल्या. अनेकांची मनधरणी करत शेवटी जळगाव जिल्ह्यामध्ये महायुतीचे उमेदवार नंदकिशोर महाजन हे विजयी झाले.

**प्रमुख विजयी उमेदवार**

**भाजप :** प्राजक्त तनपुरे, सुहास शिरसाट, धैर्यशील कदम, राजेंद्र राऊत, बसवराज पाटील, राजीव पोतदार, नंदकिशोर महाजन, प्रवीण पोटे, अमर राजुरकर यांच्यासह ११ उमेदवार विजयी.

**शिवसेना (शिंदे गट) :** रवींद्र फाटक, दुष्यंत चतुर्वेदी, सईद खान.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) : अनिकेत तटकरे, विक्रम काकडे.

अपक्ष : गोकुळ गिते (नाशिक)

---

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## पशुधन चोरी करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश

### चार गुन्ह्यांची उकल, तीन आरोपी फरार

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** साक्री आणि पिंपळनेर परिसरातील शेतकऱ्यांचे पशुधन चोरी करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) पर्दाफाश करत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत ९ म्हशी, २ पारडू आणि चोरीस गेलेले चारचाकी वाहन हस्तगत करण्यात आले असून पशुधन चोरीचे तीन आणि वाहन चोरीचा एक अशा एकूण चार गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. साक्री व पिंपळनेर परिसरात गेल्या काही दिवसांत शेतकऱ्यांच्या शेतातून पशुधन चोरीच्या घटना घडत होत्या. शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या पशुधनाच्या चोरीमुळे ग्रामीण भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनांचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांना गुन्ह्यांचा छडा लावण्याचे निर्देश दिले होते. यानुसार स्थानिक गुन्हे शाखेने विशेष तपास पथक तयार करून साक्री, पिंपळनेर, निजामपूर तसेच धुळे जिल्ह्यालगतच्या




विविध भागांत समांतर तपास सुरू केला. सलग सात दिवस तांत्रिक विश्लेषण, गुप्त माहिती आणि स्थानिक पातळीवरील चौकशीच्या आधारे पोलिसांनी संशयितांचा माग काढला. दि. २२ जून २०२६ रोजी साक्री-नवापूर महामार्गावरील एका पानटपरीजवळून पोलिसांनी सराईत गुन्हेगार सुरेश ऊर्फ सुन्या रमेश गावीत (वय ३२, रा. सारवट, ता. नवापूर, जि. नंदुरबार) याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपल्या तीन साथीदारांसह साक्री व पिंपळनेर परिसरातून म्हशी चोरी केल्याची कबुली दिली. या टोळीत प्रभु होडया गावीत (रा. उची शेवडी), योहान जनू गावीत (रा. ओन्टी पाडा, विसरवाडी) आणि रवि गावीत (रा. रायपूर), ता. नवापूर, जि. नंदुरबार यांचा समावेश असल्याचे समोर आले. आरोपींनी टाटा आरएक्स चारचाकी वाहनाचा वापर करून पशुधन चोरीचे गुन्हे केल्याची माहिती तपासात निष्पन्न झाली.

---

## ठाकरे गटाला मोठा धक्का! ओमराजेंसह ६ खासदारांचा शिंदे गटात प्रवेश

### 'सहा टायगर' शिवसेनेत दाखल; लोकसभा निवडणुकीनंतर राज्याच्या राजकारणात उलथापालथ

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** | महाराष्ट्राच्या राजकारणात सोमवारी मोठा राजकीय भूकंप झाला. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतील सहा विद्यमान खासदारांनी पक्षाला रामराम ठोकत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत अधिकृत प्रवेश केला. या घडामोडीमुळे ठाकरे गटाला मोठा धक्का बसला असून आगामी राजकीय समीकरणांवर त्याचे दूरगामी परिणाम होण्याची चिन्हे आहेत. धाराशिवचे ओमराजे निंबाळकर, परभणीचे संजय जाधव, यवतमाळ-वाशीमचे संजय देशमुख, शिर्डीचे भाऊसाहेब वाकचौरे, ईशान्य मुंबईचे संजय दिना पाटील आणि हिंगोलीचे नागेश अष्टीकर या सहा खासदारांनी शिंदे गटात प्रवेश केला.

पक्षप्रवेश सोहळ्यात बोलताना एकनाथ शिंदे यांनी नव्या खासदारांचे स्वागत करत, "आज येथे सहा टायगर उपस्थित आहेत. शिवसेना हे एक कुटुंब आहे आणि



कट्टर शिवसैनिक आमच्यासोबत आले आहेत," असे सांगितले. तसेच परभणीचे संजय जाधव, यवतमाळचे संजय देशमुख आणि ईशान्य मुंबईचे संजय दिना पाटील यांच्या प्रवेशामुळे "आता आमच्याकडे ट्रिपल संजयची ताकद आली आहे," अशी मिश्कील टिप्पणीही त्यांनी केली. धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांच्यावर विरोधकांकडून होत असलेल्या 'रीलस्टार' टीकेलाही शिंदे यांनी उत्तर दिले. "ओमराजे हे रील स्टार नाहीत, तर जनतेच्या मनातील रिअल स्टार आहेत," असे म्हणत त्यांनी निंबाळकरांची पाठराखण केली. यावेळी २२ जून २०२२ च्या बंडाची आठवण करून देताना शिंदे म्हणाले की, "शिवसेना, धनुष्यबाण आणि बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्वाचे विचार वाचवण्यासाठी आम्ही उठाव केला होता. आता त्या लढ्याचा दुसरा टप्पा सुरू झाला आहे." लोकसभा निवडणुकीनंतर ठाकरे गटातील ही सर्वात मोठी राजकीय गळती मानली जात असून, राज्यातील शिवसेनेच्या राजकारणात नव्या संघर्षाची नांदी मानली जात आहे. सहा खासदारांच्या या निर्णयामुळे ठाकरे गटासमोरील संघटनात्मक आव्हाने आणखी वाढणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

---

## ६ खासदारांच्या बंडावर अण्णा हजारे भडकले!

### खासदारांवर निशाणा; 'स्वतःच्या हितासाठीच अनेकजण पक्ष बदलतात'

जन सम्राट टाईम्स

**अहमदनगर/मुंबई| प्रतिनिधी :** उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतील सहा खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या पक्षांतरावर ज्येष्ठ समाजसेवक ANNA HAZARE यांनी तीव्र प्रतिक्रिया देत पक्ष बदलणाऱ्या नेत्यांवर निशाणा साधला आहे. श्रद्धा, निष्ठा आणि ध्येयवादाचा अभाव असल्यामुळेच अशा प्रकारचे पक्षांतर होत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. राज्यातील ताज्या राजकीय घडामोडींवर भाष्य करताना अण्णा हजारे म्हणाले की, "अशा पद्धतीने पक्ष बदल करणे योग्य नाही. श्रद्धा, निष्ठा आणि ध्येयवाद नसल्यामुळेच दलबदल होते. समाजासाठी काम करण्याची भूमिका असलेले नेते सहजासहजी पक्ष बदलत नाहीत. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर विश्वास ठेवणारे




कट्टर शिवसैनिक आज आमच्यासोबत आले आहेत. २२ जून २०२२ रोजी शिवसेना, धनुष्यबाण आणि हिंदुत्वाचे विचार वाचवण्यासाठी आम्ही उठाव केला होता. आता त्या लढ्याचा दुसरा टप्पा सुरू झाला आहे," असे शिंदे म्हणाले. तसेच काहीजण माध्यमांमधून आरोप-प्रत्यारोप करत असल्याचा उल्लेख करत, "मी सर्वांचा मान-सन्मान राखेन. नव्याने आलेल्या खासदारांच्या मतदारसंघातील प्रश्न सोडवण्यासाठी सरकारच्या माध्यमातून सकारात्मक प्रयत्न केले जातील," असे आश्वासनही त्यांनी दिले. अण्णा हजारेंच्या या वक्तव्यामुळे पक्षांतराच्या राजकारणावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

---

## कौटुंबिक वादातून पतीकडून पत्नीची कोयत्याने निर्घृण हत्या

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी :** येथील भवानीनगर-भिलाटी परिसर सोमवारी दुपारी एका थरारक हत्याकांडाने हादरून गेला. कौटुंबिक वादाच्या पार्श्वभूमीवर एका पतीने आपल्या पत्नीवर भररस्त्यात कोयत्याने सपासप वार करत निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात मंदाबाई विकास जाधव (मूळ रा. रायपूर कंडारी) यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर परिसरात भीती आणि खळबळ पसरली असून पोलिसांनी आरोपी पतीला काही तासांतच ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंदाबाई जाधव या भवानीनगर येथील रहिवासी रामा सोमा बागले यांच्या कन्या होत्या. काही काळ जामनेर तालुक्यातील चिचखेडा येथे वास्तव्यानंतर त्या पती विकास जगन्नाथ जाधव याच्यासह नशिराबादमध्ये राहत होत्या. सोमवारी दुपारी त्या आपल्या सहा वर्षीय मुलाच्या शाळा प्रवेशासाठी सुनसगाव रोडवरील जिल्हा परिषद मराठी शाळेत गेल्या होत्या. प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून त्या मुलासह घरी परतत असताना दुपारी सुमारे २ ते २.२० वाजेच्या दरम्यान खंडेराव मंदिर परिसरात दबा धरून बसलेल्या पतीने त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. आरोपीने हातातील कोयत्याने मंदाबाई यांच्यावर वारंवार वार केले. भररस्त्यात झालेल्या या भीषण हल्ल्यामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला. गंभीर जखमी झालेल्या मंदाबाई रक्ताच्या थारोळ्यात कोसळल्या आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. या हल्ल्यावेळी त्यांचा लहान मुलगा घटनास्थळी उपस्थित होता. परिस्थितीचे



गांभीर्य ओळखून जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकांनी तत्परता दाखवत मुलाला सुरक्षितपणे शाळेत नेले, त्यामुळे मोठा अनर्थ टळला. घटनेनंतर आरोपी विकास जाधव हा रक्ताने माखलेल्या अवस्थेत घटनास्थळावरून फरार झाला. मात्र नशिराबाद पोलिसांनी तात्काळ शोधमोहीम हाती घेत काही अंतरावरील एका ओसाड घरातून त्याला अटक केली. त्यामुळे या गंभीर गुन्ह्याचा तपास वेगाने सुरू करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच भुसावळ विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी केदार बारबोले तसेच नशिराबाद पोलीस ठाण्याच्या प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता नारखेडे यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला असून पुढील तपासासाठी फॉरेन्सिक पथकालाही पाचारण करण्यात आले. फॉरेन्सिक तज्ज्ञांनी घटनास्थळावरील महत्त्वाचे पुरावे आणि नमुने संकलित केले आहेत. दरम्यान, या हत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून कौटुंबिक वादातून हा प्रकार घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. भरदिवसा घडलेल्या या निर्घृण हत्येमुळे नशिराबाद परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी कायदा-सुव्यवस्थेबाबत चिंता व्यक्त केली आहे.

---

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

## महसूल प्रशासनाविरोधात रेती व्यावसायिकांचा एल्गार

### गुजरातमधून कायदेशीररित्या आणलेल्या रेतीवरील बंदी हटविण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

**जामखेड | प्रतिनिधी :** नंदुरबार जिल्ह्यातील महसूल प्रशासनाकडून होत असलेल्या कथित बेकायदेशीर कारवाया आणि रेती वाहतुकीवरील निर्बंधांच्या विरोधात जिल्ह्यातील रेती व्यावसायिक, वाहन मालक, चालक आणि बांधकाम क्षेत्राशी संबंधित घटक आक्रमक झाले आहेत. या पार्श्वभूमीवर सोमवारी (दि. २२ जून) जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मूक मोर्चा काढण्यात आला. मोर्चानंतर निवासी उपजिल्हाधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. मोर्चेकऱ्यांची प्रमुख मागणी म्हणजे गुजरात राज्यातून कायदेशीररित्या महसूल रॉयल्टी व जीएसटी भरून आणल्या जाणाऱ्या रेतीच्या वाहतुकीवरील बंदी तात्काळ हटविण्यात यावी. अन्यथा तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आंदोलकांनी दिला आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, नंदुरबार जिल्ह्यात सध्या शासकीय विकासकामे, खासगी बांधकामे तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या घरकुलांसाठी मोठ्या प्रमाणावर रेतीची आवश्यकता आहे. मात्र स्थानिक स्तरावर रेतीची उपलब्धता नसल्यामुळे बांधकाम व्यवसाय अडचणीत आला आहे. यावर पर्याय म्हणून अनेक व्यावसायिक गुजरात राज्यातील अधिकृत रेती घाटांमधून महसूल व जीएसटी भरून कायदेशीररित्या रेती खरेदी करून जिल्ह्यात आणत




आहेत. मात्र महाराष्ट्राच्या हद्दीत प्रवेश केल्यानंतर संबंधित वाहनांना अडवून कारवाई केली जात असल्याचा आरोप व्यावसायिकांनी केला. देशात 'वन नेशन, वन टॅक्स' धोरण लागू असताना कायदेशीर मार्गाने आणलेल्या रेतीच्या वाहतुकीत अडथळे निर्माण करणे अन्यायकारक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. व्यावसायिकांच्या म्हणण्यानुसार, यापूर्वी शासनाने शौर्य कंपनीमार्फत वाहनांना जीपीएस प्रणाली बसवून 'झिरो रॉयल्टी'ची व्यवस्था लागू केली होती. त्यामुळे रेती वाहतुकीत पारदर्शकता निर्माण झाली होती. मात्र ही व्यवस्था अचानक बंद करण्यात आल्याने कायदेशीररित्या आणलेल्या रेतीच्या विक्री-वाहतुकीवरही परिणाम झाला आहे. यामुळे हजारो वाहन मालक, चालक, बांधकाम मजूर, ठेकेदार आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले असल्याचे आंदोलकांनी सांगितले. अनेकांनी वाहनांसाठी कर्ज घेतले असून हप्ते भरणेही कठीण झाले आहे.रेती वाहतुकीच्या प्रश्नावर जिल्ह्यातील बांधकाम आणि वाहतूक क्षेत्र एकवटल्याने प्रशासनाची भूमिका काय राहणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### तीव्र आंदोलनाचा इशारा

गुजरातमधील अधिकृत रेती घाटांमधून खरेदी केलेल्या रेतीची नंदुरबार जिल्ह्यात वाहतूक व विक्री करण्यास तात्पुरती मंजुरी द्यावी. पूर्वीप्रमाणे 'झिरो रॉयल्टी' व्यवस्था पुन्हा सुरू करावी.सर्व शासकीय नियम व अटींचे पालन करून आवश्यक शुल्क भरण्यास व्यावसायिक तयार असून प्रशासनाने अडवणूक थांबवावी. प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास जिल्ह्यातील रेती व्यावसायिक, वाहतूकदार, बांधकाम ठेकेदार, मजूर आणि त्यांचे कुटुंबीय वाहनांसह जिल्हा प्रशासनाविरोधात व्यापक आंदोलन छेडतील, असा इशारा निवेदनातून देण्यात आला. या आंदोलनातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीस जिल्हा प्रशासन व महाराष्ट्र शासन जबाबदार राहील, असेही आंदोलकांनी स्पष्ट केले.

# तरवाडे गावाला अखेर 'जलद' बसेसचा थांबा

## विद्यार्थी, नोकरदार आणि ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा

जन सम्राट टाईम्स



**कापडणेप्रतिनिधी:** तरवाडे गावातील ग्रामस्थांची अनेक वर्षांपासूनची प्रलंबित मागणी अखेर पूर्ण झाली असून आता गावात अती जलद, जलद आणि निमजलद एसटी बसेसना अधिकृत थांबा मिळाला आहे. आमदार राघवेंद्र (राम) भदाणे यांच्या निर्देशानुसार आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर हा निर्णय घेण्यात आला असून आजपासून या बसेस गावात थांबू लागल्या आहेत. त्यामुळे ग्रामस्थ, विद्यार्थी, नोकरदार आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून तरवाडे गावाला जलद एसटी बसेसचा थांबा मिळावा, अशी मागणी नागरिकांकडून सातत्याने केली जात होती. मात्र विविध कारणांमुळे ही मागणी प्रलंबित होती. आमदार राम भदाणे यांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येत अखेर गावाला जलद बसेसचा थांबा मंजूर करण्यात आला. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी विभाग नियंत्रक अहिरे यांनी स्वतः तरवाडे गावाला भेट दिली. यावेळी त्यांनी प्रत्यक्ष बस थांबवून चालक व वाहकांना आवश्यक सूचना दिल्या. त्यामुळे नव्याने मंजूर झालेल्या थांब्याची अंमलबजावणी तातडीने सुरू झाली. या प्रसंगी जितू माळी, डॉ. मनोज पाटील, नारायण जमादार, बापू जमादार, शाम पाटील, रणवीर जमादार, विकास पाटील, मनोहर पाटील, विजय माळी, नितेश पवार, बाबाजी बाविस्कर, मीराबाई पाटील, कोळीलाबाई पाटील, आशा पाटील, अरुणाबाई राजपूत, वैजंताबाई पाटील, आमदार प्रतिनिधी गणेश देसले यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते. जलद बसेसचा थांबा मिळाल्यामुळे शिक्षण, नोकरी, व्यवसाय तसेच वैद्यकीय कामांसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांची मोठी सोय होणार आहे. विशेषतः शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना तसेच ज्येष्ठ नागरिकांना याचा मोठा लाभ मिळणार आहे. यावेळी ग्रामस्थांनी आमदार राम भदाणे यांचे आभार व्यक्त करत, "आमदार रामदादांच्या प्रयत्नांमुळे आमचा प्रवास अधिक सोयीस्कर आणि सुखकर होणार आहे," अशी भावना व्यक्त केली. तरवाडे गावाच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा टप्पा ठरत असून ग्रामस्थांनी त्याचे स्वागत केले आहे.

### नागरिकांची मोठी सोय होणार

गेल्या अनेक वर्षांपासून तरवाडे गावाला जलद एसटी बसेसचा थांबा मिळावा, अशी मागणी नागरिकांकडून सातत्याने केली जात होती. मात्र विविध कारणांमुळे ही मागणी प्रलंबित होती. आमदार राम भदाणे यांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येत अखेर गावाला जलद बसेसचा थांबा मंजूर करण्यात आला. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी विभाग नियंत्रक अहिरे यांनी स्वतः तरवाडे गावाला भेट दिली.

# विहीर अनुदानासाठी ३० हजारांची लाच

## पंचायत समितीतील कंत्राटी तंत्रज्ञ एसीबीच्या जाळ्यात

जन सम्राट टाईम्स



**जळगाव । प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांमधील लाचखोरी पुन्हा एकदा उघडकीस आली असून विहीर अनुदान मंजूर करून देण्यासाठी ३० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या जामनेर पंचायत समितीतील कंत्राटी वरिष्ठ तंत्रज्ञाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली आहे.

या कारवाईमुळे पंचायत समिती प्रशासनासह जिल्ह्यातील शासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. सागर न्हावकर असे अटक करण्यात आलेल्या कंत्राटी वरिष्ठ तंत्रज्ञाचे नाव आहे. तक्रारदाराच्या विहिरीच्या अनुदान प्रस्तावास मंजुरी देण्यासाठी त्याने यापूर्वी ३० हजार रुपयांची लाच स्वीकारल्याचा आरोप आहे. त्यानंतर आणखी ३० हजार रुपयांची मागणी केल्याने त्रस्त झालेल्या तक्रारदाराने जळगाव लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेत तक्रार दाखल केली.

तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीच्या पथकाने सोमवारी जामनेर पंचायत समिती परिसरात सापळा रचला. मात्र, कारवाईची चाहूल लागताच आरोपीने ऐनवेळी लाचेची रक्कम स्वीकारण्यास नकार दिला. तरीही एसीबीच्या पडताळणीत त्याने लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने अधिकाऱ्यांनी त्याला तात्काळ ताब्यात घेत अटक केली. या कारवाईचे नेतृत्व जळगाव एसीबीचे पोलीस उपअधीक्षक योगेश ठाकूर यांनी केले. यावेळी पोलीस निरीक्षक रेशमा अवतारे, स्मिता नवघरे तसेच एसीबीच्या पथकाने सापळा यशस्वीपणे पार पाडला. शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी नागरिकांकडून लाच मागण्याच्या प्रकारांवर एसीबीकडून सातत्याने कारवाई होत असली तरी अशा घटना अद्याप थांबत नसल्याचे चित्र आहे. जामनेरमधील या कारवाईमुळे लाचखोर अधिकारी व कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले असून जिल्ह्यात याची जोरदार चर्चा सुरू आहे.

### 30 हजार रुपयांची लाच स्वीकारल्याचा आरोप

सागर न्हावकर असे अटक करण्यात आलेल्या कंत्राटी वरिष्ठ तंत्रज्ञाचे नाव आहे. तक्रारदाराच्या विहिरीच्या अनुदान प्रस्तावास मंजुरी देण्यासाठी त्याने यापूर्वी ३० हजार रुपयांची लाच स्वीकारल्याचा आरोप आहे. त्यानंतर आणखी ३० हजार रुपयांची मागणी केल्याने त्रस्त झालेल्या तक्रारदाराने जळगाव लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेत तक्रार दाखल केली.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# विरोधी पक्षनेते पदासाठी एमआयएमचा एल्गार

## प्रशासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटम



जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** धुळे महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेते पदाच्या मागणीवरून राजकीय वातावरण तापले असून, सहा महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नावर अखेर ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एमआयएम) पक्षाने आक्रमक भूमिका घेत धरणे आंदोलन छेडले आहे. शहरातील क्यूमाईन क्लब परिसरात पक्षाचे नेते इर्शाद भाई जागीरदार यांच्या नेतृत्वाखाली नगरसेवक, पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्त्यांनी एकत्र येत प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. महानगरपालिका निवडणुकीचे निकाल लागून जवळपास सहा महिने उलटून गेले असतानाही विरोधी पक्षनेते पदाची नियुक्ती न झाल्यामुळे एमआयएम कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

महानगरपालिकेत संख्याबळाच्या आधारे एमआयएम हा दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष असतानाही त्यांना विरोधी पक्षनेतेपदापासून वंचित ठेवण्यात येत असल्याचा आरोप पक्षाने केला आहे. यावेळी बोलताना इर्शाद भाई जागीरदार यांनी प्रशासनावर आणि सत्ताधाऱ्यांवर गंभीर आरोप करत म्हटले की, लोकशाही व्यवस्थेत विरोधी पक्षाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. मात्र धुळे महानगरपालिकेत जाणूनबुजून आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष असूनही विरोधी पक्षनेते पद न देणे ही लोकशाही मूल्यांची पायमल्ली असल्याचे त्यांनी नमूद केले. एमआयएमच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी उच्च न्यायालयाच्या निकालाचाही दाखला दिला. न्यायालयाने यापूर्वी दिलेल्या आदेशानुसार विरोधी पक्षनेते पद हे कोणत्याही नव्याने तयार झालेल्या आघाडीला न देता संख्याबळाच्या आधारे दुसऱ्या क्रमांकाच्या पक्षालाच देणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे कायदेशीरदृष्ट्याही हे पद एमआयएमला मिळणे अपेक्षित असल्याचा दावा आंदोलकांनी केला. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करत आपल्या मागण्यांकडे लक्ष वेधले. अनेकांनी हातात फलक घेऊन विरोधी पक्षनेते पदाच्या नियुक्तीची मागणी केली. या प्रश्नावर प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा जनआंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

# सिंधुदुर्गात पावसाचे पुनरागमन

जन सम्राट टाईम्स

**सिंधुदुर्ग | प्रतिनिधी:** गेल्या दहा-बारा दिवसांच्या प्रदीर्घ खंडानंतर अखेर सिंधुदुर्ग जिल्ह्यात पावसाने पुन्हा एकदा हजेरी लावली आहे. रविवारी पासून जिल्ह्यातील अनेक ठिकाणी झालेल्या हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरींमुळे कोरड्या पडू लागलेल्या धरणीमातेला दिलासा मिळाला असून, करपू लागलेल्या भात रोपांना नवसंजीवनी मिळाली आहे. यामुळे गेल्या काही दिवसांपासून चिंतेत सापडलेल्या बळीराजाच्या चेहऱ्यावर समाधानाचे वातावरण दिसून येत आहे. यावर्षी मान्सूनपूर्व पावसाने दमदार हजेरी लावल्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी वेळेत भात पेरणीची कामे पूर्ण केली होती. मृग नक्षत्राच्या प्रारंभी चांगला पाऊस होईल, या अपेक्षेने अनेकांनी मोठ्या प्रमाणात पेरण्या केल्या होत्या. मात्र त्यानंतर पावसाने अचानक दडी मारल्याने शेतकऱ्यांची चिंता कमालीची वाढली होती. मृग नक्षत्र सुरू होऊन तब्बल पंधरा दिवस उलटून गेले तरी समाधानकारक पाऊस न झाल्याने भाताची रोपे करपू लागली होती. अनेक ठिकाणी रोपांचा हिरवा रंग फिका पडून ती पिवळी दिसू लागली होती. पावसाअभावी शेतजमिनींमध्ये ओलावा कमी झाल्याने भात रोपांच्या वाढीवर गंभीर परिणाम होऊ लागला होता. काही शेतकऱ्यांनी विहिरी, ओढे किंवा उपलब्ध जलस्रोतांमधून पाणी आणून भाताच्या तरव्यांना शिंपण्याचा आटोकाट प्रयत्न केला. मात्र सर्वच शेतकऱ्यांना ही सुविधा उपलब्ध नसल्याने अनेकांच्या रोपांवर संकटाचे ढग दाटून आले होते. पाऊस आणखी काही दिवस लांबला असता तर शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. सध्या जिल्ह्यात पुन्हा एकदा ढगाळ वातावरण निर्माण झाले असून पावसाचे पोषक चित्र तयार झाले आहे. अनेक भागांत पावसाने हजेरी लावल्याने शेतजमिनींना आवश्यक ओलावा मिळाला आहे. या पावसामुळे भात रोपांना पुन्हा जीवदान मिळाले असून, आगामी काही दिवस नियमित पाऊस झाल्यास भात लागवडीची कामेही वेग घेणार आहेत.

# मन्यारखेड्यात बांधकाम सुरू असलेल्या घरातून ३० हजारांच्या वायरची चोरी!

## भिंतीतील पाईपमधून वायर ओढून नेल्याने घरमालकाला मोठा आर्थिक फटका

जन सम्राट टाईम्स



**मन्यारखेडा | प्रतिनिधी:** गावातील एका नवीन बांधकाम सुरू असलेल्या घरामध्ये अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी करत इलेक्ट्रिकल वायरिंगसाठी टाकण्यात आलेल्या महागड्या वायर लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या चोरीत अंदाजे २५ ते ३० हजार रुपये किमतीच्या वायर चोरून नेण्यात आल्याने घरमालकाला मोठा आर्थिक फटका बसला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मन्यारखेडा परिसरात एका निवासी घराचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून सध्या वीज फिटिंगचे काम सुरू होते. घरातील भिंतींमध्ये पाईप टाकून मुख्य डिस्ट्रिब्युशन बोर्ड (डीबी बॉक्स) तसेच विविध जंक्शन बॉक्सपर्यंत वायरिंगचे काम पूर्ण करण्यात आले होते. रात्रीच्या वेळी बांधकामस्थळी कोणीही नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला. चोरट्यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने मुख्य डीबी बॉक्स आणि जंक्शन बॉक्समधील वायर कटरच्या साहाय्याने कापल्या. त्यानंतर भिंतीतील पाईपमधून संपूर्ण वायर ओढून काढत त्या लंपास केल्या. विशेष म्हणजे, चोरांनी केवळ साहित्य चोरी केले नाही तर पूर्ण झालेल्या वायरिंग कामाचेही नुकसान केले आहे. आज सकाळी घरमालक आणि कामगार कामासाठी घटनास्थळी पोहोचले असता मुख्य इलेक्ट्रिकल बोर्ड आणि जंक्शन बॉक्स रिकामे दिसून आले. तपासणी केल्यानंतर पाईपमधून सर्व वायर चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. हा प्रकार पाहून घरमालकाला मोठा धक्का बसला. या घटनेमुळे परिसरातील बांधकाम व्यावसायिक आणि घरमालकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था वाढविण्याची गरज अधोरेखित होत असून, अज्ञात चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. स्थानिक नागरिकांनीही अशा प्रकारच्या वाढत्या चोरीच्या घटनांवर अंकुश ठेवण्यासाठी पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, या घटनेमुळे मन्यारखेडा परिसरात खळबळ उडाली असून चोरट्यांचा शोध घेण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे.

# स्वच्छतेचा संदेश घराघरांत पोहोचविण्याचा निर्धार

## ग्रामस्थ, विद्यार्थी व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

जन सम्राट टाईम्स




**रोटवद। प्रतिनिधी :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत रोटवद गावात सोमवारी स्वच्छता दिवस उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात ग्रामस्थ, विद्यार्थी, ग्रामपंचायत पदाधिकारी आणि कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत गाव स्वच्छतेसाठी श्रमदान केले. यावेळी गावातील प्रमुख रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, शाळा परिसर, ग्रामपंचायत कार्यालय परिसर तसेच इतर महत्त्वाच्या भागांची स्वच्छता करण्यात आली. स्वच्छता मोहिमेमुळे गाव परिसर स्वच्छ आणि आकर्षक बनला असून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती होण्यास मदत झाली. स्वच्छता अभियानादरम्यान ग्रामस्थांना संबोधित करताना सरपंच व ग्रामविकास अधिकाऱ्यांनी स्वच्छता ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असल्याचे सांगितले. गाव स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्यासाठी सर्वांनी सामूहिक जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन त्यांनी केले. या मोहिमेत भूपेंद्र बाविस्कर (सहाय्यक प्रशासन अधिकारी, धरणगाव पंचायत समिती), माजी सरपंच मोहनभाऊ शिंदे, ग्रामपंचायत लिपिक डिगंबर जाधव, जन-सम्राट टाईम्सचे प्रतिनिधी प्रशांत शिंदे, दिनू आप्पा, राजेश पाटील, राजू गोसावी, पंडित न्हावी, हिरामण मराठे यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घेतला. तसेच छायाचित्रणाची जबाबदारी शुभम शिंदे यांनी पार पाडली. ग्रामपंचायतीतर्फे भविष्यातही अशा स्वच्छता मोहिमा नियमितपणे राबविण्यात येणार असून, गावाला स्वच्छता आणि विकासाच्या बाबतीत आदर्श बनविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. या उपक्रमामुळे रोटवद गावात स्वच्छतेचा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचला असून ग्रामस्थांनीही अशा उपक्रमांचे स्वागत केले आहे.

# शिरपूरमध्ये दारूबंदी विभागाची धडक कारवाई

## जोयदा येथील गोडाऊनवर छापा

जन सम्राट टाईम्स



**शिरपूर | प्रतिनिधी:** दारूबंदी विभागाने शिरपूर तालुक्यातील जोयदा गावात मोठी धाड टाकत बेकायदेशीर मद्यसाठ्यावर मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत 106 ड्रममध्ये साठवलेले 23 हजार 520 लिटर मद्य, तसेच विविध ब्रँडच्या 135 बॉक्स दारूचा साठा जप्त करण्यात आला असून, एकूण 67 लाख 77 हजार 250 रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे. या प्रकरणी दोन फरार आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दारूबंदी विभागाचे जवान हेमंत पाटील यांना जोयदा गावातील एका गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणावर मद्यसाठा असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती.

त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. कारवाईदरम्यान गोडाऊनमध्ये 106 ड्रममध्ये भरलेले 23 हजार 520 लिटर मद्य आढळून आले. याशिवाय परराज्यातील इम्पेरियल ब्ल्यू व्हिस्कीचे 50 बॉक्स आणि मॅकडॉवेल नंबर वन व्हिस्कीचे 85 बॉक्स असा एकूण 135 बॉक्स दारूसाठा जप्त करण्यात आला. संपूर्ण मुद्देमालाची किंमत 67 लाख 77 हजार 250 रुपये असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या प्रकरणी प्रवीण भालचंद्र वाणी उर्फ दादा वाणी आणि ताराचंद सायसिंग पावरा या दोघांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोन्ही आरोपी सध्या फरार आहेत. त्यांचा शोध घेण्यासाठी पथकांकडून प्रयत्न सुरू आहेत. दारूबंदी विभागाच्या या कारवाईमुळे परिसरातील अवैध मद्यव्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून दारूमाफियांचे धाबे दणाणले आहेत. अवैध मद्यसाठ्याविरोधात विभागाकडून आगामी काळातही अशाच कठोर कारवाया सुरू राहणार असल्याचा इशारा अधिकाऱ्यांनी दिला आहे. दारूबंदी विभागाचे जवान हेमंत पाटील यांना जोयदा गावातील एका गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणावर मद्यसाठा असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती.

त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. ही कारवाई राजेश देशमुख (आयुक्त, दारूबंदी विभाग), प्रसाद सुर्वे (सहआयुक्त), यू. आर. वर्मा (विभागीय उपायुक्त) आणि स्वाती काकडे (अधीक्षक, दारूबंदी विभाग, धुळे) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. बालाजी हीप्परगेकर यांच्या नेतृत्वाखाली संतोष निकम, डी. जी. गवळी, हेमंत पाटील, गोरख पाटील, केतन जाधव, प्रशांत बोरसे, दारासिंग पावरा तसेच शिरपूर तालुका पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने ही यशस्वी कारवाई पार पाडली.अवैध मद्यसाठ्याविरोधातील ही अलीकडील काळातील सर्वात मोठ्या कारवायांपैकी एक मानली जात असून, यामुळे अवैध दारू तस्करीच्या जाळ्यावर मोठा आघात झाल्याचे बोलले जात आहे.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# केळी बागायतदारांच्या प्रश्नांबाबत मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या मागणीनुसार पीकविमा, नुकसानभरपाई मदतीवर चर्चा

जन सम्राट टाईम्स



### शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर विशेष चर्चा

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे दि. १० जून रोजी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत जळगाव जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर विशेष चर्चा करण्यात आली होती.

**पाळधी/जळगाव । प्रतिनिधी:** जळगाव जिल्ह्यासह राज्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दि. २३ जून २०२६ रोजी दुपारी १.४५ वाजता विधान भवन, मुंबई येथील मुख्यमंत्री समिती कक्षात महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे यापूर्वी दि. १० जून रोजी मंत्रालयात राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय (दत्ता मामा) भरणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत जळगाव जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर विशेष चर्चा करण्यात आली होती. या बैठकीत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी पिक विम्याबाबत तसेच MRSAC अहवालाबाबत तांत्रिक अडचणी तसेच केळी उत्पादकांना विशेष आर्थिक सहाय्य देण्याचा मुद्दा उपस्थित केला होता. यावेळी त्यांनी मध्यप्रदेशच्या धर्तीवर नुकसानग्रस्त केळी उत्पादकांना प्रति हेक्टर दोन लाख रुपये विशेष मदत देण्याची जोरदार मागणी केली होती. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी मांडलेल्या मागण्यांबाबत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सकारात्मक भूमिका घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार आता मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली ही विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. उद्याच्या बैठकीत केळी बागायतदारांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, पीकविमा दावे, अवकाळी पाऊस, वादळी वारे व गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीचा आढावा, केळी उत्पादन व विपणनाशी संबंधित प्रश्न तसेच शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा होणार आहे. बैठकीस पालकमंत्री गुलाबराव पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, आ. प्रा. चंद्रकांत सोनवणे, आ. अमोल जावळे, आ. मंगेश चव्हाण, आ. चंद्रकांत पाटील, जिल्हाधिकारी रोहन घुगे, प्रधान सचिव (जलसंपदा), सचिव (कृषी व पणन विभाग) तसेच कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी, विमा कंपन्यांचे प्रतिनिधी, स्थानिक बँकांचे प्रतिनिधी आणि एमआरएसएसीचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306